<u>प्रेस नोट</u>

तारीख २०/५/२०१८

स्वारगेट पोलीस ठाणे चे हद्दीत वाहन चोरी व इतर चोरीचे गुन्हयांचे प्रमाणात वाढ झाल्याने स्वारगेट पोलीस स्टेशनला तपास पथकाच्या दिवसपाळी व रात्रपाळी करीता दोन पथके तयार करण्यात आली होती.तसेच पोलीस स्टेशन हद्दीत तपास पथकाचे व इतर कार्यालयीन काम करणारे कर्मचारी यांना गस्त घालणे बाबत सुचना देण्यात आल्या होत्या.स्वारगेट पोलीस स्टेशनला एल.आय.बी चे काम करणारे पो.हवा.३३३९ पंढरीनाथ शिंदे व पो.हवा.२४९५ शकील शेख यांना दिनांक १७/५/२०१८ रोजी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करत असताना बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, एका इसमाने मार्केटयार्ड येथुन हिरोहोन्डा स्प्लेंडर चोरली असुन तो महर्षीनगर येथे आला आहे. त्यानुसार पो.हवा. पंढरीनाथ शिंदे व शकील शेख यांनी सापळा रचुन त्यास चोरीचे मोटार सायकल सह ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन येथे घेवुन आले त्यास त्याचा नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव भारत शिवनाथ बटुळे वय २३ वर्ष रा.मु.पो.भारजवाडी ता. पाथर्डी जि. अहमदनगर असे सांगीतल्याने त्यास सी.आर.पी.सी. ४१(१)(ड) प्रमाणे अटक करुन त्याचे कडे अधिक तपास करता त्यांने त्याचे ताब्यात मिळुन आलेली मो.सा. ही मार्केटयार्ड पोलीस ठाणे हद्दीतुन चोरली असल्याचे सांगुन स्वारगेट पोलीस ठाणे गु.र.नं. १४२/२०१८ केल्याची कबुली दिल्याने त्यास दाखल गुनन्हयात अटक करुन त्याचे कडे अधिक तपास करता त्याने मार्केटयार्ड व स्वारगेट पोलीस ठाणे हद्दीतुन दुचाकी वाहने चोरी केली असल्याची कबुली देवुन चोरलेल्या वाहनापैकी **अंदाजे २३५०००/- रुपये किमंतीचे एकुण ११ वाहने जप्त करणेत आली** व मार्केटयार्ड पोलीस ठाणेतील दाखल दुचाकी वाहनचोरीचे एकुण ०८ गुन्हे तसेच स्वारगेट पोलीस ठाणे मधिल दुचाकी वाहन चोरीचा ०१ गुन्हा असे **एकुण ०९ गुन्हे उघड करणेत आले** पैकी ०२ दुचाकी वाहनाबाबत अधिक तपास चालु आहे. त्याचे कडुन हस्तगत करणेत आलेली वाहने विकत घेणारे इसमांवर कडक कारवाई करणेत येत आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त सो.परिमंडळ २ पुणे शहर डॉ.प्रविण मुंढे तसेच मा. सहाय्यक पोलीस आयुक्त सो.स्वारगेट विभाग पुणे डॉ.शिवाजी पवार यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत भोसले पोलीस निरीक्षक (गुन्हे ) श्री मच्छिंद्र पंडीत तपास पथकाचे अधिकारी सहा पोलीस निरीक्षक प्रकाश मोरे व पो.उप निरीक्षक समाधान कदम यांचे पथकाचे कर्मचारी क्षिरसागर, सज्जाद शेख, शकील शेख, शिंदे, गभाले, गुरव, कुंभार,शेडगे, भोकरे, साळवे,मोरे, सरक, शितकाल, दळवी, मुल्ला यांनी केलेली आहे.